# प्राचीन भारताचा इतिहास
# 5

## प्राचीन भारतीय गणराज्यांचे स्वरूप

प्रा.विठ्ठल बाबुराव गुंडे
इतिहास विभाग प्रमुख

कालिका देवी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
शिरूर कासार

अभ्यास पत्रिका- 18

वैदिक काळात गणतंत्र / प्रजासत्ताक पध्दत नष्ट होऊ लागली होती. त्याच वेळी राजेशाही प्रबळ बनू लागली पौराणिक कथानुसार प्रथम क्रांतिकारी, राजसत्ता विरोधी परशुरामाने भूमिका घेतली त्यामुळे क्षत्रियवंशा नष्ट झाला. परिणाम क्षत्रियापासून शासन व्यवस्था मुक्त झाली. पुन्हा गणराज्य उदयास आले. प्राचीन बौध्द, जैन, वैदिक. महाकाव्य या वाङःमयातून गणराज्याची माहिती मिळते.

प्राचीन भारतातील गणराज्याला जातीची पंचायत, महाजनसत्ता, प्रजासत्ताक, संघराज्य, असे इतिहासकार मानतात. **पाणिनीने** मद्र,वृजि, राजन्य, अंधक-वृष्णि, महाराजा आणि भर्ग असे ६ गणराज्य सांगितली आहेत. तर **जायसवालने** ८२ गणराज्याची यादी दिली आहे. प्राचीन ग्रीक इतिहासकारानी ही भारतातील अंबेस्टोनाय (अबस्य), अस्टकोनाय (अस्तीनायन) सिबॉय (सिबी), अस्सेकेनाय (अश्वकायन) या गणराज्याचा उल्लेख केला. शाक्य, वज्जि, लिच्छवि, कोलिया, मोरिया, मल्ल, मद्र, यौधेय, कुरु. पांचाल. सौराष्ट्र ही प्रमुख होती. शुंगकाळात यौधेय, मद्र, मालव, क्षुद्रक, शिवि, आर्जुनायन, वृष्ठि, राजन्य, महाराज, जनपद. वामरथ, शालकायन, औदुबंर इ गणराज्य होती.

**अ) गणराज्याचा कालखंड -** गणराज्याच्या काळाविषयी इतिहासकाराच्या मतभेद आहेत. गौतम बुध्दाने धर्मसंघाला लिच्छवी गणराज्याप्रमाणे कार्य करण्यास सांगितले. यावरुन सामान्यात: इ.स.पू आठव्या शतकापासून गणराज्याची सुरुवात झाली असावी. गुप्त राजा चंद्रगुप्त दुसरा याने गणराज्याचा विनाश केला. यावरुन इ.स.चौथ्या शतकापर्यंत गणराज्य अस्तित्वात होती असे सांगता येईल. इ.स.पू आठवे शतक ते इ.स.४वे शतक हा गणराज्याचा काळ मानला जातो. परंतु **इ.स.पू ६वे शतक ते इ.स.२रे शतक या काळात गणराज्य** कार्यक्षम होती. म्हणून त्याचा प्रभावी काळ मानला जातो.

**ब) गणराज्याचे स्वरुप -** प्राचीन भारतीय गणराज्याचा सार्वभौमत्वाचा / कारभाराचा अधिकार कोणत्याही एका व्यक्तीच्या हाती न देता, लोकांच्या प्रतिनिधींच्या समंतीने व सहकार्याने राज्यकारभार चालत असे. दोन / तीन गणराज्य एकत्र येऊन **संघराज्य** स्थापन केलेली होती.उत्तर भारतातील गणराज्यातील राज्यकारभारात भाग घेणाऱ्या सभासदाला **राजा** म्हणत. मुळ क्षत्रिय वंशजाच्या हाती सत्ता असलेल्या गणराज्याला **राजक गणराज्य** म्हणतात. सर्व क्षत्रियांच्या हाती सत्ता असलेल्या गणराज्याला **राजन्यक गणराज्य** म्हणतात या गणराज्यात प्रत्येकाला **राजा** ही पदवी असे. राजन्यक गणराज्याचे सिक्के खरोष्टी लिपीत कोरलेले आहेत. ते पितळाचे आहेत. महाराज जनपदाचे सिक्के **प्रथम ब्राम्ही** लिपीत नंतर क्षत्रियाच्या प्रभावामुळे खरोठी लिपीत कोरलेले आहेत.

गणराज्यामध्ये सर्वांच्या समंतीने गणाध्यक्षाची नेमणूक केली जात असे. मात्र त्याला कोणते ही विशेषधिकार नसे. सर्व निर्णय, धोरणे सर्व प्रतिनिधीच्या समंतीने घेत असे. पुढे

साम्राज्याच्या आक्रमणामुळे गणराज्य नष्ट झाली. प्राचीन काळातील काही महत्वाची गणराज्य पुढील प्रमाणे.

१) **आर्जुनायन** - इ.स.पू २०० ते इ.स.४०० या काळात **आग्रा-जयपूर** या प्रदेशात हे गणराज्य होते. हे गणराज्य **वैराज्य** स्वरुपाचे म्हणजे राजा नसून **प्रधान प्रमुख** असतो त्याचा राज्याभिषेक होत असे. अर्जुनाला आपला पूर्वज येथील शासक मानतात.

२) **यौधेय** - प्राचीन भारतातील **मोठे गणराज्य** होते. पूर्वे सहारनपूरपासून पश्चिमेस भावलपूर पर्यत व लुधियापासून दिल्लीपर्यंत विस्तार होता. या गणराज्यात तीन गणराज्य होती रोहतक (पंजाब) पांचाल (मध्यप्रदेश) उत्तर राजस्थान येथे शाखा होत्या येथील लोक रणदेवता **कार्तिकेयचे उपासक** होते. त्याचे वहान मोर असल्याने त्यांना महाभारतात मत्तमयुरक असे म्हटले आहे.अप्रतिम शौर्यासाठी हे प्रसिध्द होते. पहिल्या शतकात कनिष्काने हे गणराज्य जिंकून घेतले. पुन्हा सत्ता त्यांनी प्राप्त केली. **रुद्रदामनने** जुनागढ **शिलालेखात** या गणराज्याचा गौरव केला आहे. इ.स.३५० पर्यत यांचा इतिहास मिळतो.

३) **मद्र** - उत्तर मद्र आणि दक्षिण मद्र असे दोन गणराज्य होते. **मध्य पंजाबच्या** प्रदेशात हे राज्य होते. उत्तर मद्र गणराज्यात **राजा नव्हता**. दक्षिण मद्र मध्ये **निर्वाचित राजा** होता. इ.स.४ शतका पर्यत होते.

४) **मालव व क्षुद्रक** - चिना व रावी नदीच्या मध्य भागात मालव गणराज्य होते. त्याच्या दक्षिणेकडे क्षुद्रक गणराज्य होते. अलेक्झाडरने आक्रमण केल्यानंतर त्याचे संघराज्य स्थापन झाले. शकांनी त्यांचा पराभव केला येथे राजा नव्हता.

५) **अम्बष्ठ** - या गणराज्यात **द्विदल कार्यमंडळ** होते. वरिष्ठ मंडळातील सभासद व राज्याचे सेनानी यांची निवड लोक करत असे.

६) **पाताळ, कठ, सौभूति** - या गणराज्यात लोक एका व्यक्तीची राजा म्हणून निवड करत असे. तो योग्य काम करत नसेल तर त्याला दूर करुन दुसऱ्या व्यक्तीची निवड केली जात असे. सर्व लोकांवर राजाचा अधिकार असे. परंतू अनियंत्रित राजसत्ता नसे. पाताळ जनपदाची विशेष म्हणजे ग्रीक देशातील **स्पार्टाच्या** राज्याप्रमाणे येथे ही **द्वैराज पध्दत** होती. दोन्ही राजवंश आपला राजपदाचा हक्क उपभोगीत असे.

गणराज्याची वाढ मुख्यत्वेकरुन उत्तर भारतात झाली. **पंजाब व सिंधू** नदीच्या परिसरात इ.स.पू ५०० ते इ.स. ४०० या काळात अनेक गणराज्य निर्माण झाली. स्थानिक स्वराज्य संस्थाची कल्पना दक्षिणेकडे विशेष विकसित झाली. गणराज्य लोकशाही राज्य दक्षिण भारतात प्रचलित नव्हते.

## क) प्राचीन गणराज्याची वैशिष्टये-

१) राजा, वैराज्य आणि द्वैराज्य स्वरुपाची गणराज्य होती २) गणराज्ये वैभवसंपन्न, कार्यशील व बलिष्ठ असून स्वातंत्र्य रक्षण हे खास वैशिष्टये होते. ३) गणराज्यात सर्वांना समान अधिकार दिलेले होते. ४) गणाध्यक्ष प्रमुख असूनही त्याला विशेषधिकार दिलेले नाहीत. ५) आर्थिक स्थैर्य होते. त्यामुळे व्यापार उद्योगधंदे यांची प्रगती झाली व वैभव संपन्न शहराचा उदय झाला.

## ५.४ गणराज्याची कार्यपध्दती/घटना

बौध्द साहित्य, महाभारत आणि अर्थशास्त्र मध्ये गणराज्याच्या घटनाची माहिती मिळते. बौध्दग्रंथ अट्ठा-कथानुसार कुल परिवाराच्या प्रतिनिधीची सर्व सभासदानी अध्यक्ष (राजा), उपाध्यक्ष (उपराजानो), प्रधानसेनापती (सेनापतीनो), वित्तमंत्री (भाण्डागारिका) याची निवड केलेली असते सैनिक, राजनीतिक, व्यापारीक, शेता समाजसेवा हे सर्व विषय संसदे/परिषदे समोर येऊन सभासद त्यावर निर्णय घेत असे शहराना राज्यकारभाराचे स्वाय्यतत्तेचे अधिकार दिलेले असे. शहर परिषदेमध्ये व्यापारी, कारागीर. शेतकरी यांचे प्रतिनिधी असे मध्यवर्ती समिती ही राजधानीच्या ठिकाणी असून ती सर्वश्रेष्ठ असे. त्याचा प्रमुख **गणाध्यक्ष** असे. राजदुत (महत्तक) याची नियुक्ती सभा करत असे.

**गणराज्याची कार्यप्रणाली-** गणराज्यांच्या कार्यपध्दतीमध्ये मध्यवर्ती समिती, मध्यवर्ती कार्यकारी/कायदेमंडळ, उपसमित्या, विविध प्रशासकीय विभाग असून या माध्यमातून गणराज्याची कार्य चालत असे.

**अ) गणराज्याची मध्यवर्ती समिती :-** गणराज्याचा सर्व कारभार मध्यवर्ती समितीतर्फे चालत असे.या समितीच्या सभासदाची संख्या मोठी असे. **शाक्यच्या परिषदेत** ५०० यौधेयच्या परिषदेत -५००० **लिच्छवीच्या परिषदेत** ७७०७ सभासद होते. वेगवेगळ्या गणराज्यात ही जबाबदारी शिष्टसभा, गण, मंत्रिमंडळ याच्यावर सोपवली होती. **शिष्टसभा**-म्हणजे गावातील प्रतिष्ठीत व वृध्दजनांचे मंडळ होय. **गण-म्ह**णजे कोणतेही कार्य सर्व लोकांच्या संमतीने करणे. **मंत्रिमंडळ** -सर्व कारभार मंत्रिमंडळावर सोपवलेला होता. यौधेय गणराज्यात **मंत्रधर** नावाचा अधिकारी होता. त्याचे अधिकार म्हणजे आजच्या मंत्रिमंडळा सारखे होते. मध्यवर्ती समितीतील

सर्व प्रकारचे पूर्ण अधिकार होते. उदा. वरिष्ठांची नियुक्ती, अधिकारपदे वंशपरंपरागत चालू ठेवणे. परराष्ट्र व्यवहार, संकट प्रसंगी मदत व निर्णय इ. घेत असे. मध्यवर्ती समितीचे बरेच सभासद राजधानीच्या ठिकाणी राहत असे सभासदांची जेथे सभा होते त्या सभागृहाला **संथागार** म्हणतात.

**मध्यवर्ती / केंद्रिय समितीची कामकाज पध्दत -** केंद्रिय समितीच्या कामकाजाची तुलना आजच्या **लोकसभेच्या कामकाजाशी** करता येईल. संथागार मध्ये राजकीय, धार्मिक, सामाजिक विषयावर चर्चा होत असे. कुशीनगरच्या **मल्ल** गणराज्याच्या सभागृहात बुध्दांच्या अंत्येष्टि संस्काराविषयी चर्चा झाल्याची माहिती मिळते. मध्यवर्ती समिती गणाध्यक्षाची नियुक्ती करते. त्याच्या मदतीसाठी **गणपूरक,शलाकाग्राहक** व **कारकून** असत. सभागृहात आपल्या अधिकाराच्या प्राप्तीसाठी स्वतंत्र पक्ष बनवलेले होते या पक्षांना **वार्य गृह्य, व्रपक्ष्य** म्हणतात.

सभेच्या कामकाजाला सुरुवात होण्यापूर्वी एक अधिकारी प्रत्येक सभासदाला बसण्यासाठी आसन देत असे. सभेच्या कामकाजाला सुरुवात **ठरावाच्या मांडणीतून** होत असे परंतु ठराव मांडण्यापूर्वी सभासद सभागृहात उद्देशून भाषण करत असे त्या भाषणाला **ज्ञप्ती** म्हणत असे. त्यानंतर ठरावाच्या रुपात तो विषय सभे पुढे येत असे. त्या ठरावाला **प्रतिज्ञा** असे म्हणत. प्रतिज्ञेला अनुमती असेल ते स्वस्थ बसत असे. इतर त्यावर चर्चा करत असे. कधी-कधी तीन वेळा मोठयादा प्रतिज्ञा वाचून दाखविली जात असे सभागृह तटस्थ राहिले ती प्रतिज्ञेला मंजूरी मिळून त्याचे कायदयात रुपातर होत असे.

सभेच्या बैठकीला कामचलाऊ संख्येची आवश्यकता असे. ती संख्या कीती असावी हे अगोदरच ठरविलेले असे. ही सख्या नसेल तर, सभेचा निर्णय ग्राहय मानला जात नसे या **संख्येला वर्ग** म्हणतात. ही संख्या मोजण्यासाठी **गणपूरक अधिकारी** असे आजच्या कायदेमंडळात जो प्रतोद असतो त्याच्याशी गणपूरकाची तुलना करतात.

सभासदाच्या मताला **छंद** म्हणत एखादया सभासदाला मतदानाचा अधिकार असेल परंतु तो सभेला हजर राहू शकत नसेल तर, आपले मत सभेकडे पोचविण्याची व्यवस्था करता येत असे. परंतु अश्या मतांचा विचार करावयाचा की नाही हा अधिकार सभागृहावर अवलंबून होता. ठराव पास झाला तर त्याची गरज नसे. प्रतिज्ञावर मतभेद होत असे, त्या वेळी मतदानासाठी सभासदांना विविध रंगाच्या मतपत्रिका वाटल्या जात. त्या मत पत्रिकेला **शलाका** म्हणत **शलाकाग्राहक** नावाचा अधिकारी असे. गुप्त पध्दतीने मतदान होई. त्यास गुहाक म्हणत कित्येकदा प्रकट स्वरुपामध्ये मतदान घेतले जाई त्यास **वितरक मतदान** म्हणत शलाकाच्या विविध रंगाचा हेतू सभासदाला समजून सांगतला जात. केंद्रिय समितीच्या कारभाराच्या नोंदीसाठी कारकून असे.

**क) मध्यवर्ती कार्यकारी मंडळ /मंत्रिमंडळाची कार्य पध्दत :-** गणराज्याच्या स्वरुपानुसार कार्यकारा मंडळ किंवा मंत्रिमंडळाची संख्या असे मल्ल गणराज्याची चार, **लिच्छवीची मंडळ**, संख्या होती प्रशासकीय कारभारात गुप्तता टिकवण्यासाठी योग्या निर्णय जलद घेणे व अंमलबजावणी होण्यासाठी कमी संख्या असावी साधारणपणे ४ ते २० सभासद संख्या असावी त्यांची नेमणूक केंद्रिय समितीकडून होत असे सभासदांच्या अंगी प्रज्ञा, पौरुष, उत्साह, अनुभव, शास्त्र, गणराज्याची परंपरा इ. गुण असावे

कार्यकारी मंडळ सर्व निर्णय प्रधानमंत्र्याच्या नेतृत्वाखाली व एकमताने घेत असे प्रत्येक सभासदाकडे एक स्वतंत्र विभाग असे. उदा. परराष्ट्र विभाग, आयव्यया विभाग, (महसूल विभाग) न्यायदान विभाग त्या त्या विभागातील सर्व कामे त्यांना करावी लागत असे.

**ड)प्रशासकीय विभाग -** गणराज्यातील ग्रामाचा कारभार स्थानिक सभासदाकडे असे. यामध्ये बहुधा क्षत्रिय वर्णाचे सभासद असे. या मध्ये राजकीय, सामाजिक विषयावर चर्चा करत असे. शहाराचा कारभार **शहर परिषदेमार्फत** चालत असे. क्षत्रिय,व्यापारी,सामान्याचे प्रतिनिधी असे शहाराच्या प्रश्ना संदर्भात चर्चा करत असे.

प्रांत हा प्रशासनाचा तिसरा विभाग होता. त्याच्या प्रमुखाची नेमणूक बहुधा **केंद्रीय समिती तर्फे** केली जात असावी त्याच्या मदतीसाठी अधिकारी असे. केंद्रीय समिती राजधानीच्या ठिकाणी असे.

श्री जायस्वालने **हिंदू पॉलिटी** या ग्रंथात इ.स.पू ६व्या शतकात भारतात लोकशाहीचा बीजे राजकीय जीवनात रुजलेली होती त्यावरुन घटनात्मक राजकीय जीवन व जबाबदार राज्य पध्दती इ.स.पूर्व ६व्या शतकात दृढ झालेली होती. काहीच्या मते ६ व्या शतकात पूर्वीच अस्तित्वात असली पाहिजे त्याच्या मते भारतात पूर्वी सार्वमताची पध्दत असावी सार्वमतालाच **परिपृच्छ** असे म्हणतात राईस **डेव्हिडच्या** मते "बळ राजेशाहीबरोबरच कमी अधिक प्रबळ गणराज्य किंवा जनपदे असावी" प्राचीन भारतात लोकशाही माहित नसावी पंरतु लोकशाही पध्दतीने राज्यकारभार करण्याचे ज्ञान प्राप्त होते केवळ अनियंत्रित राजेशाहि होती असे नाही.